


नदीकाठी ससुला
जाफर इब्राहिमी नासर
भाषांतर : मिलिंद परांजपे
चित्रकार : अलि मफखेरी
ज्योत्स्ना प्रकाशन

# नदीकाठी ससुला

मूळ लेखक : जाफर इब्राहिमी नासर
मराठी भाषांतर : मिलिंद परांजपे
चित्रकार : अलि मफखेरी



ज्योत्स्ना प्रकाशन



Originally published as: Khargoosh Va Roodkhaneh
Author: Jaafar Ebrahimi Nasr    Illustrator: Ali Mafakheri
© Shabaviz Publishing Company, Tehran, Iran

मराठी आवृत्ती : नदीकाठी ससुला
प्रकाशक : मिलिंद ल. परांजपे, ज्योत्स्ना प्रकाशन
'धवलगिरी', ४३०-३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०
मुंबई ऑफिस : मोहन बिल्डिंग, १६२ ज.शंकरशेठ मार्ग, गिरगाव, मुंबई ४००००४
मराठी भाषांतर © ज्योत्स्ना प्रकाशन, २००७
पहिली आवृत्ती : सप्टेंबर २००७
मुद्रक : रिच प्रिंटस्, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३०
मूल्य रुपये २५/-    ISBN 81-7925-170-6




एक होता ससुला. दाट जंगलातल्या एका मोठ्या झाडापाशी त्याचं छोटंसं घरकुल होतं. तो तिथे एकटाच राहत असे. त्याचे एक काका होते. काकांचं घर होतं जंगलाच्या दुसऱ्या बाजूला. तिथे ते व त्यांची मुलं राहत असत. ससुला कधीकधी जात असे त्यांच्या भेटीला, नि गेला की चार दिवस राहूनच परत येई.


गेले पाच-सहा दिवस सतत पाऊस पडत होता. आज मात्र पावसानं सुटी घेतली होती. सकाळी जाग आल्यावर नेहमीप्रमाणेच उठावं का नको असा विचार करत, ससुल्यानं हळूच डोकं वर करून पाहिलं.

बाहेर छान कोवळं ऊन पडलेलं पाहून त्याला आनंद झाला. चटकन तो उठला. त्याच्या मनात आलं, 'काय छान हवा पडली आहे, आज काकांकडे जायला हवं.'

मनात यायचा अवकाश, पटापट आवरून निघाली स्वारी!









चालत चालत तो नदीपाशी पोहोचला.

काकांचं घर होतं पलीकडे. नेहमीप्रमाणे त्याला पूल ओलांडून जायचं होतं. पण आज त्याला पूलच मिळेना. त्याला वाटलं, चुकला बहुतेक रस्ता. मग त्यानं नदीच्या कडेनं डाव्या-उजव्या दोन्ही बाजूला जाऊन पाहिलं, पण पूल काही दिसेना.



शेवटी दमून तो नदीकाठी बसला. 'आता पलीकडे कसं जायचं?' तो स्वतःशीच म्हणाला. 'पाण्यात पाय टाकला की संपलोच मी! मला काही पोहता येत नाही.'

नदीजवळच्या चिखलात एक बेडूक उड्या मारत होता. ससुल्याला बघून तो त्याच्याजवळ गेला.



'राम राम ससेभाऊ, काय शोधताय इकडेतिकडे?'

'बेडूकराव, इथे एक पूल आहे ना हो, कुठे आहे तो?'

'आहे नव्हे, होता.'

'म्हणजे?'

'गेल्या आठवड्यात खूप पाऊस झाला ना, तेव्हा नदीला पूर आला होता. त्यात वाहून गेला तो.'

'अरे बापरे! आता मी काय करू? मला पलीकडे जायचं होतं. माझे काका त्या बाजूला राहतात.'

हे ऐकून बेडूक पण विचारात पडला.

'बेडूकराव, आता तुम्हीच मला मदत करा. सुचवा बघू एखादा उपाय पलीकडे जाण्यासाठी.'

'तुम्ही विचारताय खरं, पण मला नाही काही सुचत.'

'माझ्या जागी तुम्ही असतात तर काय हो केलं असतं?'

बेडूकराव हसत म्हणाले, 'मी ना? सोपं आहे की! सरळ पाण्यात उडी मारली असती नि पलीकडचा तीर गाठला असता.'

'एवढ्या वाहत्या पाण्यातसुद्धा तुम्हांला पोहता येतं?'

'त्यात काय? पाणी वाहतं असो नाहीतर खोल असो, मी सहज पोहू शकतो.'



'तुमचं ठीक आहे हो, पण मला नाही ना पोहता येत, मी कांय करू ते सांगा.'

इतक्यात एक चिमणी भुर्रऽऽकन उडत आली नि काठावरच्या दगडावर बसली. मग त्यांच्याकडे पाहत चिवचिव करत म्हणाली, 'काय छान ऊन पडलं आहे नाही आज!'

तिच्याकडे पाहत आपल्या घोगऱ्या आवाजात बेडूक म्हणाला, 'होय, हवा पण मस्त आहे! पण बरं झालं तू आलीस ते, या सशाला जायचं आहे पलीकडे, नि त्या बिचाऱ्याला पोहता येत नाही. सांग बरं आता त्यानं काय करावं ते!' चिवचिवत ती म्हणाली, 'मला नाही बाई असं काही सांगता येणार.'



ससुला म्हणाला, 'असं काय गं, सांग ना काहीतरी. माझ्या जागी तू असतीस तर काय केलं असतंस सांग पाहू?'

सशाचा प्रश्न ऐकून ती हसत हसत म्हणाली, 'अरे वेड्या, मी उडत जाईन की!'

'नदीच्या दुसऱ्या तीरापर्यंत न थांबता तुला उडता येईल?'

'अरे, मी पक्षी आहे. कुठंही जायचं झालं तर आम्ही उडतच जातो.'

ससा म्हणाला, 'तेही खरंच की, पण मला नाही गं उडता येत तुझ्यासारखं, मी काय करू सांग?'



चिमणी म्हणाली, 'मला खरंच नाही रे सुचत काही, पण आपण शांतपणे जरा विचार करू या, सुचेल एखादी युक्ती!'

इतक्यात एक हत्तीदादा डुलत डुलत नदीवर आले.


आल्या आल्या नदीत सोंड बुडवून त्यांनी पाणी प्यायला सुरुवात केली. पोटभर पाणी प्याल्यावर त्यांनी बाजूला पाहिलं तर तिथे हे तिघं बसलेले.

'राम राम छोट्या दोस्तांनो,' हत्तीदादा सोंड हालवत म्हणाले.




हत्तीकडे पाहून तिघं म्हणाले, 'राम राम हत्तीदादा, राम राम.'


मग बेडूक म्हणाला, 'बरं झालं तुम्ही आलात ते. या सशाला पलीकडे जायचं आहे. पूल तर परवाच्या पावसात वाहून गेलाय! त्याला ना माझ्यासारखं पोहता येत ना चिऊताईसारखं उडता येत! काय करावं बरं त्याने? सुचवा एखादा उपाय!'



आपलं भलं मोठं डोकं हालवत हत्ती म्हणाला, 'मला नाही सुचत काही.'

मग ससा म्हणाला, 'हत्तीदादा, मला एक सांगा, तुम्ही जर असता ना माझ्या जागी तर काय हो केलं असतं?'







हे ऐकून सोंड वर करून गडगडाट करत हत्तीने हसायला सुरुवात केली. मग जरा थांबून ते म्हणाले, 'तुझ्या जागी जर मी असतो ना, तर सरळ चालत नदी पार केली असती.'

हे ऐकल्यावर तिघं आश्चर्यचकित होऊन त्यांच्याकडे पाहू लागले.




'अरे छोट्यांनो, मी केवढा अगडबंब नि उंच आहे ते पाहिलंत का? हा प्रवाह मला काय करणार? तो मला वाहून नेऊ शकत नाही आणि बुडवूही शकत नाही. पण खरं सांगायचं तर मी जर तुझ्या जागी असतो तर पलीकडे गेलोच नसतो.'

'का?'

'कारण... कारण तुझे काका आणि तुझे भाऊ तुझ्या घरी तुझी वाट बघताहेत.'

'काय? माझ्या घरी?'



'होय! सकाळी मी नदीशी आलो तर ते चौघं पलीकडच्या किनाऱ्यावर असाच तुझ्यासारखा विचार करत उभे होते. मग मीच त्यांना पाठीवरून या बाजूला आणलं नि अगदी थेट तुझ्या दारात नेऊन सोडलं. पण तिथे पोचलो तर तुझाच पत्ता नाही. आता बसले आहेत तुझी वाट पाहत.'





हे ऐकून ससा आनंदानं उडी मारून उठला नि तिघांचे आभार मानून थेट घराच्या दिशेनं पळत सुटला!



ज्योत्स्ना प्रकाशन

□ 'धवलगिरी'
४३०-३१ शनिवार पेठ
पुणे ४११०३०

□ मुंबई ऑफिस: मोहन बिल्डिंग
१६२-ब ज. शंकरशेठ मार्ग
गिरगाव, मुंबई ४००००४

□ jyotsnaprakashan@vsnl.com

9788179251706 >

